ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 5 | ISSUE - 1 | SEPTEMBER - 2018

HISTORICITY RESEARCH JOURNAL

जैन धर्मीय राजा ईल व शिरपूर, मुक्तागिरी एक अभ्यास

प्रा. डॉ. प्रशांत प्रल्हादराव कोठे
सहयोगी प्राध्यापक व इतिहास विभाग प्रमुख, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महा.
आकोट जि. अकोला.

प्रस्तावना

''विदर्भात जैन धर्मीयांची प्रदीर्घ आणि समृद्ध परंपरा राहीली आहे. अकोला जिल्ह्यातील राजनापूर खिनखिनी येथे मिळालेल्या कास्य जैन प्रतिमा हा त्याचा पुरावा आहे. त्या इ.स. नवव्या शतकातील आहेत. या ागात जैन धर्म प्रचलित झाला होता. या काळात विदर्भावर राष्ट्रकूट वंशाचे शासन होते. राष्ट्रकूट वंशात प्रथम अमोघवर्ष हा जैन होता. त्याने 'आदीपुराण' चा रचीता जिनसेन किंवा गणितसारसंग्रहाचा कर्ता महावीराचार्य सारखे जैन विद्वानांना त्याने राजाश्रय दिला होता. याशिवाय येथे जैन धर्मासंबंधी अनेक पुरावे मिळतात.''[१] त्यातील शिरपूर, कारंजा, अकोला, एलिचपूर, मेहकर, केळझर इ. पैकी शिरपूर, एलिचपूर आणि कारंजा यांचा उल्लेख मोठ्य प्रमाणात येतो.

इ.स. च्या १० व्या शतकात या भागात राष्ट्रकूटांचे राज्य होते. ''त्यांचा मांडलिक म्हणून राजा ईल उर्फ श्रीपाल हा जैनधर्मावलंबी होता. त्यामुळे वेरुळ येथील लेण्या, शिरपूर येथील गावाबाहेरील अंतरीक्ष पार्श्वनाथ, पवरी दिगांबर जैन मंदीर व मुक्तागिरी येथील दिगांबर जैन मंदीरे या राज्याच्या कारकिर्दीमध्ये प्रामुख्याने निर्माण झाल्याचा इतिहास आढळतो. विदर्भातील प्रसिद्ध इतिहास संशोधक स्व. श्री. य. खु. देशपांडे, श्री. वि. भि. कोलते तसेच श्री यादव माधव काळे या सर्वांचे या बाबतीत एकमत आढळते. ईल हा राजा दिगांबर जैन धर्मावलंबी असल्यामुळे या सर्व स्मारकांची ठेवण, घडण व त्यामधील मुर्त्या या त्यानुरुप असणे स्वाभाविक आहे.''[२]

विदर्भात जैन संस्कृतीचा प्रसार राजा ईलमुळे झाला असे सर्वच जैन ग्रंथात आढळते. राजा ईलच्या पूर्वजीवनाविषयी फारशी माहिती मिळत नाही. तो वंश परंपरेने गादीवर आला असे दिसत नाही. ''इल्ली देशाच्या अचलपूरला तु जा. हरिवर्ष नावाचा राजा तिथे राज्य करतो आहे. त्याचा मरणकाल निकट आलेला आहे. तेव्हा ती राज्यलक्ष्मी तुझी प्रतिक्षा करीत आहे.''[३]

श्रीपाल किंवा श्रीगोपाळ शिरपूरला तपश्चर्या करीत होता. त्यावेळी त्याला जिनेंद्र प्रसन्न होऊन जो दृष्टांत झाला त्यावेळी त्यात वरील विधान आले आहे. गोपाळ राजा बनण्याच्या आधी वऱ्हाडात इल्ली वंशाचे राज्य असून त्याची राजधानी अचलपूर होती. त्याठिकाणी हरीवर्ष नावाचा राजा राज्य करीत होता. त्याला संतती नसून त्याचा मृत्यू जवळ आला होता. या दृष्टांतामुळे श्रीगोपाल उर्फ ईल अचलपूरकडे आला. याचवेळी राजा हरिवर्षचा मृत्यू झाला. त्याला मूलबाळ नसल्याने दरबारातील लोकांनी राजा निवडण्यासाठी हत्तीला वश करण्याची अट ठेवली. ती श्रीगोपाळने स्वीकारली व हत्तीला वश केले. त्यामुळे ठरल्याप्रमाणे त्याचा राज्यभिषेक झाला. त्यानंतर त्याने श्रीपाळ असे नाव धारण केले.

त्याने आपल्या राज्यात सुस्थिरता निर्माण केली. प्रजेच्या कल्याणाची कामे हाती घेतली. व अचलपूरची भरभराट केली. ''असे म्हणतात की हा गोपाल दुसरा तिसरा कोणी नसून खारवेलच्याच वंशातील एक होता. म्हणून राज्यप्राप्ती होताच राजाने श्रीपाल नांव धारण करुन 'एल' वंशीय आहे असे घोषीत केले.''[४]

''वऱ्हाडात एलिचपूर येथे ईल नावाचा एक जैन राजा इ.स. १०५८ च्या सुमारास राज्य करीत होता. त्यामुळे जैन धर्मास राजाश्रय मिळून त्याचा बराच प्रसार झाला. शिरपूर येथील प्रसिद्ध जैन मंदीर, मुक्तागिरी नावाचे प्रेक्षणीय क्षेत्र, पातूर, ांदक वगैरे जुनी देवळे व विहार अस्तित्त्वात आली.''[५]

''वऱ्हाडातील शिरपुरचे पार्श्वनाथ मंदीर व मुक्तागिरीची अनेक मंदीरे उभारुन जैन धर्माला उत्तेजन देणारा ईल (इ.स. १०५८) नावाचा राजा एलीचपूर येथे राज्य करीत होता. त्याच्या दरबारी गजनीच्या एक फकीर अपमान झाल्याचे निमित्य करुन महंमद गजनीचा भाचा रहिमानशहा ईल राजावर चालून आला. या युद्धात ईल व रहिमानशहा हे आपआपल्या धर्माची प्रतिष्ठा राखण्यासाठी लढत असता दोघेही बळी पडले''[६]

वरील दोन्ही लेखातील काळ इ.स. १०५८ ऐवजी वि.स. १०५८ मानला तर सर्वांचा काळ समकाळ येईल. व तो परस्पराशी जुळतो. इस्लाम साहित्यातूनही याच काळाचे दर्शन होते. 'तसकीरे रहमानी' यात लिहिले आहे की हिंदू लोक इल राजाने अचलपूरची स्थापना इ.स. १०५८ मध्ये केल्याचे सांगतात. पण मुसलमान लोक इल राजाचा वध इ.स. १००४ मध्ये झाला असे मानतात. १०व्या शतकातील राष्ट्रकुटांच्या ताम्रपटात अचलपूरचा उल्लेख येतो व येथे कंकराज उर्फ ककराज राज्य करीत होता असे दिसून येते. यावरुन अचलपूर ईल राजाच्या आधीच बसले होते हे सिद्ध होते आणि इ.स. १०५८ च्या आधी विद र्ति ईल नावाचा जैन राजा होऊन गेला असे दिसते. राजा ईल आणि त्याचे पूर्वज यासंबंधी अधिक माहिती मिळू शकत नाही. राजा ईल हा एलिचपूर पासून ७ कि.मी. अंतरावर वडगाव जवळील खानजमानगरचा रहिवासी होता.[७] या गावातील अवशेषावरुन ते प्राचीन असल्याचे दिसते.

जैन ग्रंथात राजा ईल हा गोपालकाचा पुत्र होता व पदमावली देवीच्या प्रसादाने आणि कृपेने त्याला राजपद प्राप्त झाले असे वर्णविले आहे. ईल विषयी माहिती जैन व मुस्लीम ग्रंथात मिळते. राजा ईल याचे मुळ नाव श्री गोपाल होते. उपदेश सारतिका या जैन ग्रंथात राजा ईल उर्फ श्री गोपाल याची कथा दिली आहे.[८] ईल हे वंशाचे नांव आहे. त्याच नावाने तो प्रसिद्ध झाला असावा. कलींगराज खारवेल हा देखील ईल वंशाचा होता.[९] खारवेल याने माळव्यावर स्वारी केली होती आणि विदर्भावर देखील त्याचा अंमल होता. याचा पुरावा हाथीगुंफा येथील शिलालेखात आहे. त्या वंशापासून श्री गोपाळची उत्पत्ती असावी. पूर्वइतिहास जरी अस्पष्ट असला तरी अचलपूरचा राजा हरिवर्ष याचा मृत्यू झाल्यानंतर ईल हा राजा होता. हा ऐतिहासिक पुरावा जमेस धरता दहाव्या शतकात ईल विद र्चा प्र ावी राजा होता.''[१०] हे अनेकांनी स्पष्ट केले आहे.

राजा ईल हा विदर्भाच्या मध्ययुगीन इतिहासातील एक महत्त्वाचे व्यक्तिमत्त्व आहे. त्याने जैन धर्माचा स्वीकार करुन विदर्भात ठिकठिकाणी वैभवशाली जैन मंदिरे उभारलीत. राजा ईलचा काळ हा विदर्भातील जैन संस्कृतीचे सुवर्णयुग मानावे लागेल. राजा ईल झाला नसता तर विदर्भात जैन संस्कृतीचा विकास झाला नसता असे म्हटले जाते ते योग्य आहे. कारण विदर्भात जी काही महत्त्वाची मंदिरे निर्माण झाली त्यांच्याशी राजा इलचा संबंध जोडला जातो. त्यातील काहींचा उल्लेख करायचाच झाला तर शिरपूर, मुक्तागिरी, द्रावती, ऐलोरा, भांदक यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो. शिरपूर, मुक्तागिरी विषयीची थोडक्यात माहिती खालीलप्रमाणे:—

शिरपूर :—

जिल्हा वाशिमपासून १७ मैलावर शिरपूर नावाचे गांव असून दिगांबर जैनांचे तिर्थक्षेत्र आहे. येथील श्री पार्श्वनाथाची मुर्ती जमीनीपासून अधर असलेली ही भव्य मुर्ती कोणी निर्माण केली असेल? असे कुतूहल मनात उद्‌भवते.

राजा ईलच्या धर्मकार्याचे एक महत्त्वाचे प्रमाण जैन मुनी सोमधर्म गणि द्वारा प्रचित उपदेश सप्ततिका या जैन ग्रंथातून मिळते. राजा ईल उर्फ गोपाल हा पराक्रमी व जनहीतदक्ष शासक आहे. ''त्याला कुष्ठरोग होता.''[११] संपूर्ण शरीर पीत आणि श्वेत दिसून लागले. अनेक औषधोपचार केले तरी परिणाम झाला नाही. राजा मराठवाड्याच्या दिशेने एलोराजवळ भटकंती करीत असतांना ''एका तलावात त्याने हातपाय धुतले. एलिचपूरला परत आल्यानंतर चमत्कार दिसला. त्याच्या हातापायावरील डाग दूर झाले होते.''[१२] या झालेल्या प्रकारा विषयी राजमाता व पत्नी यानी विचारल्या नंतर झालेला प्रकार ईल राजाने दोघींनाही सांगीतला. तेव्हा त्यांनी ज्या ठीकानी हा प्रकार घडला त्या ठिकाणी चलण्यास सांगीतले. ''राजमाता आणि ईलची पत्नी अचलादेवी सोबत पुन्हा त्या तलावात जाऊन त्याने स्नान केले आणि पूर्ण शरीर रोगमुक्त झाले.''[१३] त्या रात्री त्याच्या पत्नीला स्वप्न पडले. ''त्यात एक मूर्ती दिसली. ती बैलगाडीत अचलपूरला न्यावी पण ईल राजाने मागे फिरुन बघू नये. परंतु शिरपूरला ईल राजाने मागे बघितले आणि ती मूर्ती तेथेच हवेत तरंगत राहीली. मग राजाने तेथे मंदिर बांधले. ते पावली मंदिर म्हणून ओळखतात.''[१४] ही मूर्ती जमीनीचा आधार न घेताच हवेत तरंगत आहे. पुजारी त्या मुर्तीखालून कापड काढून दाखवतात. भगवान पार्श्वनाथाची मुर्ती ४२ इंच उंच आणि ३० इंच रुंद आहे. ते भारतातील एक प्रमुख जैन तिर्थ मानले जाते. ''जैन धर्मग्रंथावरुन मुर्तीची स्थापना संवत ११४२ मध्ये माघ शुद्ध पंचमीला विजय मुहूर्तावर राजा ईल याने केली.''[१५] प्रा. डॉ. एम. सी. भट्ट यांनी संवत ११४२ (इ.स. १०८६) हा अंतरीक्ष पार्श्वनाथ शिरपूर येथील मूर्ती स्थापण्याचा काळ दाखविला आहे तो मला रुचत नाही. माझ्या मते हा काळ निदान एक शतक मागे जातो. ईल राजाने शिरपूर येथे अंतरिक्ष पार्श्वनाथाची स्थापना केली असे सांगितले जाते. राजा ईल हा रहमानशहा बरोबर झालेल्या युद्धात मारला गेला. हे युद्ध इ.स. १००१—०२ च्या दरम्यान झाले. दुल्हा रहमान शहाचा मृत्यू इ.स. १००१—०२ (हिजरी सन ३९२) सांगितला जातो. राजा ईल जर इ.स. १००२ मध्ये मृत्यू पावला तर त्याने शिरपूरला या घटनेनंतर ही अंतरिक्ष पार्श्वनाथाच्या मूर्तीची स्थापना केली कशी. यावरुन असे दिसते की शिरपूर येथील अंतरिक्ष पार्श्वनाथाची स्थापना संवत ११४२ च्या आधीची असेल. नाही तर ही स्थापना ईल ने केली नसावी असे दिसते.

शिरपूर हे प्रसिद्ध जैन धार्मिक क्षेत्र वऱ्हाडच्या अधिपत्याखाली येत होते. त्यांच्या काळात या तिर्थक्षेत्राची मोठी प्रसिद्ध होती. येथे कार्तिक महिन्यात तीन दिवस मोठी यात्रा भरते. भारतातील दुरदूरुन भाविक येथे दर्शनासाठी येतात. त्याचे महत्त्व मुसलीम काळातही टिकून होते. हे दिसुन येते.

मुक्तागिरी:

एलिचपूरच्या ईशान्य दिशेला सातपुडा पर्वताच्या शृंखलेत मेघागिरी नामक सुंदर पर्वत आहे. राजा ईल ने अनेक जैन मंदिरे बांधल्याचे सांगतात. मुक्तागिरी हे ठिकाण पहाडात आहे. तेथे एक धबधबा असून तेथील देखावा रम्य आहे. या पहाडावर धबधब्याच्या शेजारीच ही मंदिरे आहेत. या ठिकाणी अनेक जैन साधू मोक्षास गेले असे सांगतात.''[१६] येथे असणाऱ्या देऊळांमध्ये ''ईल राजाने येथे भगवान पार्श्वनाथाचे मंदिर बांधले. क्रमांक १० चे मंदिर अतीप्राचीन आणि मनोरम आहे. या मंदिरावर धबधबा आहे. ... या मंदिरातील काळ्या दगडाची भगवान पार्श्वनाथाची प्रतिमा मनोरम आणि कलात्मक आहे. मूर्ती क्र. ९ आणि १० मध्ये एक सभामंडप आहे. त्याच्या मधोमधच एका फरशीवर चौरस काढलेला आहे. राजा ईलचा खजिना त्या दगडाखाली असावा असा प्रवाद आहे. ईलचे संरक्षक त्या ठिकाणी करमणुकी करीता बसत होते. मुक्तागिरी येथे ४८ जैन मंदिर आहे आणि ८५ जैन मुर्ती आहेत.''[१७] ''मंदिराचा आरंभ राजा ईलने केला.'' काही मंदिरे मात्र १२ व्या, १३ व्या शतकातील आहेत. सातपुडा पर्वताच्या दोन टेकडयांवर

हे ठिकाण आहे. मध्यभागी एक पाण्याचा धबधबा आहे. या पैकी काही देवळे अंधाऱ्या गुहेत आहेत. अंधाऱ्या गुहेत प्रवेष केल्यावर अनेक वेळा दुग्धधवल संगमवरी प्रचंड जैनमुर्ती डोळयांसमोर दिसतात. जैनमुर्ती संगमवरी पांढऱ्या अथवा गुळगुळीत काळया पाषाणाच्या आहेत त्यापैकी एक देवालय म्हणजे खरोखरच वास्तु कलेचा एक चमत्कार म्हणावे लागेल. चारशे फुट उंचीच्या काळा प्रस्तरात हे देवालय कोरले असून धबधब्याजवळ प्रवेशद्वार आहे. जैनांच्या 'निर्वाण भक्ती' या ग्रंथात या स्थळाचा उल्लेख आला आहे. बहुतेक देऊळात पार्श्वनाथाच्या मूर्ती आहेत. ही देवालये बहुतेक दहाव्या शतकात निर्माण झाली आहेत. काही देवळावर शालिवाहन शके १४८८ अशी नोंद आहे. मूर्ती नग्नवस्थेत आहेत. मुक्तागीरी वस्तीपासून दूर असल्यामुळे इस्लामी आक्रमणाच्या काळात हे ठिकाण सुरक्षित राहिले आहे.''[१८] येथिल १,१०,२६ व ४० ही मंदीरे सर्वात जुनी व मुख्य मंदीरे आहेत.[१९] ''कार्तिक मध्याच्या १५ ला दरवर्षी येथे फार मोठी जत्रा भरत असते. याला हजारो लोक येत असतात. येथे राहण्यासाठी फार मोठ्य धर्मशाळा आहेत''[२०]

''मुक्तागीरी येथे सुंदर धबदबा आहे. या ठिकानाला स्थानिक लोक वऱ्हाडचे काश्मीर संबोधतात. सातपूडा पर्वतावरून येनारे पाणी सतत येथे पडत असते. हा धबदबा २०० फुट उंची वरून पाणी पडत असते.''[२१] ''मुक्तागीरी येथील सैंदर्य म्हणजे येथील सुंदर धबदबा होय. तो पाहायचा असेल तर जून ते सप्टेंबर महीण्यात जाने योग्य राहते.[२२]

नि□कर्श :– विदर्भात अनेक आद्य जैन मंदिरांचा निर्माता आणि रक्षक राजा ईल आहे. ही सर्व मंदिरे सुंदर कलात्मक आणि मनोरम आहेत. ईलच्या काळास विदर्भातील जैन संस्कृतीचे सुवर्णयुग मानले पाहिजे. जर राजा ईल झाला नसता तर विदर्भात जैन संस्कृतीचा विकास झाला नसता.

आज शिरपुर येथील जैन मंदीरे सीपत्य कलेच्या दृष्टीने उत्कृष्ट आहे. त्या मंदीर स्थानत्याचा पर्यटनाच्या दृष्टीने उपयोग करून घेने गरजेचे आहे. मुक्तागीरीहेही वऱ्हाडातील एक महत्वाचे जैनधर्मीयांचे व नैर्सगीक विविधतेमुळे पर्यटकांचे पर्यटन स्थळ म्हणून विकसित झाले आहे ते राजा ईल शिवाय झाले नसते. मुक्तागीरी या पर्यटन स्थळामुळे येथील स्थानिकांना जो रोजगार उपलब्ध झाला आहे, तो झाला नसता. आज अशा पर्यटन स्थळाचा अजून विकास होने गरजेचे आहे. तरूनांना ते विकशीत करण्यासाठी मोठा वाव आहे. शासनाने यासाठी पुढाकार घेण्याची नितांत गरज आहे. हाच या उद्देश या शोधनिबंद सादर करण्या मागील आहे.

संदर्भ ग्रंथ सूची

१) गुप्त नथ्थूलाल, विदर्भ का सांस्कृतिक इतिहास, पृ.क्र. ६१.
२) अविनाशे अजय, नागपूर पत्रिका पर्युषण पर्व विशेषांक १७—९—९४ (लेख).
३) पंडित नेमचंद्र डोणगावकर, श्री अंतरिक्ष पार्श्वनाथ दिगांबर जैन संस्थान श्रीरपूर, पृ. क्र. ८.
४) कित्ता, पृ. क्र. ८.
५) काळे या. मा., वऱ्हाडचा इतिहास, पृ.क्र. २७३.
६) डॉ. पानसे मु. ग., यादव कालीन महाराष्ट्र, पृ.क्र. १४६.
७) Amravati District Gazetteer (Old) Ellichpur Town.
८) डॉ. भट्ट एम. सी., लोकमत साहित्य जत्रा, रविवार १९८३.
९) देशमुख प्र. रा., अचलपूरचा इतिहास, लोकमत साहित्य जत्रा, ७ ऑगष्ट १९८३.
१०) डॉ. भट्ट एम. सी., लोकमत साहित्य जत्रा, रविवार १९८३.
११) Central Provinces and Berar, District Gazetteers, Akola District, p. 390.
१२) डॉ. भट्ट एम. सी., विद र्चा राजा ईल आणि जैन संस्कृती, लोकमत साहित्य जत्रा, रविवार १९८३
१३) Akola District Gazetteers, p. 390.

१४) डॉ. भट्ट एम. सी., विदर्भाचा राजा ईल आणि जैन संस्कृती, लोकमत साहित्य जत्रा, रविवार १९८३.
१५)देशपांडे य. खु., एलिचपूर वऱ्हाडची जुनी राजधानी, पृ.क्र. ६.
१६) डॉ. भट्ट एम. सी., विदर्भाचा राजा ईल आणि जैन संस्कृती, लोकमत साहित्य जत्रा, रविवार १९८३.
१७) काळे या. मा., वऱ्हाडचा इतिहास, पृ.क्र. २७३.
१८) कोलारकर, पुरंदरे, विदर्भाचा इतिहास, पृ. क्र. ८३.
https://en.wikipedia.org/wiki/Muktagiri
१९) https://en.wikipedia.org/wiki/Muktagiri
२०) दैनिक हिंदूस्थान, अमरावती, ६ मे १९९६.
२१) Dr. M.M. Malvi - The Hitavad Date - 8 oct.1997
२२) https://en.wikipedia.org/wiki/Muktagiri